पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४.
ई- मेल - sp.washim@mahapolice.gov.in
Website: www.washimpolice.gov.in

जा.क्र :-पोअवा/पोकशा/पो.अधि-कर्म/समाधान हेल्पलाईन/२०२१. 6463 दिनांक वाशिम १.१०.२०२१.

4 OCT 2021

विषय:- वाशिम पोलीस घटकातील पोलीस अमंलदार यांचेकरिता उपलब्ध असलेल्या समाधान हेल्पलाईन बाबत.

***

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, वाशिम पोलीस घटकात पोलीस अधीक्षक कार्यालय च्या आवक-जावक कक्षात मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई. यांचे आदेशान्वये "समाधान हेल्पलाईन" दिनांक २०.५.२०१७. पासून कार्यरत आहे.

"समाधान हेल्पलाईन" करिता महिला पोलीस अमंलदार मपोना १०५९ संगिता राऊत व मपोशि १०५२ वर्षा व्यवहारे यांची दिनांक ४.८.२०२१. पासून नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे. "समाधान हेल्पलाईन" चा हेल्पलाईन क्र. ०७२५२-२३१३५५ हा असून सदरच्या हेल्पलाईन क्र.वर तक्रार नोंद करुन आपले समस्यांचे निराकरण संबधिताकडून ७ दिवसात करण्यात येते.

"समाधान हेल्पलाईन"कडून समस्येचे निराकरण न झाल्यास आपले पोलीस स्टेशन/शाखेचे प्रभारी अधिकारी यांची मुख्यालय सोडण्याची परवानगी घेऊन आपल्या समस्ये संबधाने कोणाताही आज्ञांकित कक्ष न घेता प्रत्यक्ष मा. पोलीस अधीक्षक ,वाशिम. यांना समस्या सांगण्याची परवानगी राहील.

4 OCT 2021

( बच्चन सिंह, भा.पो.से.)
पोलीस अधिक्षकवाशिम.

1.10.21

प्रति:
सर्व ठाणेदार,वाशिम जिल्हा.
सर्व शाखा प्रमुख पोलीस अधीक्षक कार्यालय,वाशिम.

प्रत:
उप-विभागिय पोलीस अधिकारी,वाशिम,मंगरुळपीर,कारंजा
पोलीस उपअधीक्षक(गृह),वाशिम.
कार्यालय अधीक्षक ,पोलीस अधीक्षक कार्यालय,वाशिम.

प्रत माहितीस
अपर पोलीस अधीक्षक,वाशिम.

Spare copy

**तातडीचे**

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/क.वृं.प-४८वी सभा-समाधान हेल्पलाईन/१४६/२०१६ मुंबई, दिनांक- ०६/०९/२०१६

विषय :- घटक कार्यालयांतील प्रशासकीय कामाकाजाची शीघ्रतेने निर्गती व्हावी, यासाठी "समाधान हेल्पलाईन" सुरु करण्याबाबत -

******

राज्यातील सर्व पोलीस घटक कार्यालयामध्ये प्रशासकीय कामकाजाची शीघ्रतेने निर्गती व्हावी, यासाठी पोलीस अधीक्षक, जळगांव यांनी सुरु केलेल्या "समाधान हेल्पलाईन" प्रमाणेच सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयात "समाधान हेल्पलाईन" हा उपक्रम तात्काळ सुरु करावा. सदर समाधान हेल्पलाईन हा उपक्रम सुरु करण्यासाठी एक वापरातील दूरध्वनी क्रमांक निश्चित करुन तो घटकातील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांचे निदर्शनास आणून द्यावा. हेल्पलाईनवर तक्रार नोंदविण्यासाठी दैनंदिन ०२ पुरुष / महिला पोलीस कर्मचा-याची नेमणूक करावी. सदर हेल्पलाईनची प्रामुख्याने पुढील बाबींसाठी आवश्यकता आहे :-

१) घटक कार्यालयांतील कामाची वेगाने निर्गती,

२) अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या घटक कार्यालयांतील अडचणी इत्यादि करिता वारंवार कार्यालयात येण्याचे टाळण्यासाठी,

३) घटक कार्यालयांतील कामाची पारदर्शकता,

४) घटकातील पोलीस अधिकारी / कर्मचा-यांची कामे, हक्काची रजा, वेतन निश्चिती, वेतनवाढ, वेतन पडताळणी, निवृत्ती वेतन व तत्संबंधी देय लाभ, शिट रिमार्कस्, बक्षिसे, कसुरी , घरभाडे, पदोन्नतीची सद्यस्थिती, वेल्फेअरसंबंधी सर्व कामकाज इत्यादि.

२. घटकातील कार्यरत, तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांच्या वरीलप्रमाणे प्रशासकीय अडचणी असतील तर त्यांनी प्रत्यक्षात घटक कार्यालयात न येता हेल्पलाईन म्हणून दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावर तक्रार नोंदवावी. तक्रार नोंदविल्यानंतर त्या कार्यालयातील संबंधीत लिपिकांशी संपर्क साधून त्या तक्रारीची शक्यतो त्याच दिवशी निर्गती करुन तक्रारदारास फोनवरुन माहिती कळविण्यात येईल.

३. समाधान हेल्पलाईन दररोज नियमितपणे चालू असल्याची तपासणी करण्याची व ती कार्यरत ठेवण्याची जबाबदारी पोलीस निरीक्षक, कल्याण/मानव संसाधन शाखा यांची असेल.

४. प्रत्येक आठवड्यास पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय / सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), हे घटकातील अधिकारी/कर्मचा-यांकडून प्राप्त होणा-या तक्रारींचा आढावा घेतील. ज्या तक्रारीमध्ये विलंब झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधितांस जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

५. पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/सह पोलीस आयुक्त, व इतर पोलीस अधिकारी,पोलीस निरीक्षक मानव संसाधन / कल्याण यांच्यासह दरमहा बैठक घेवून प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्याबाबत आढावा घेतील, व मागील

P...

Scanned with CamScanner

महिन्यातील प्राप्त तक्रारी, निपटारा केलेल्या तक्रारी, व प्रलंबित तक्रारी यांची माहिती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेस या कार्यालयास सादर करतील.

सदर हेल्पलाईनमुळे खालील फायदे अपेक्षित आहेत :-

१ कार्यालयीन कामकाजामध्ये पारदर्शकता,
२ तक्रारीचे वेळेत निराकरण होणे,
३ अधिकारी / कर्मचा-यांच्या वेळेची बचत,
४ कार्यालयात निष्कारण फिरणा-या व्यक्तींवर निर्बंध,
५ कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा, व
६ तक्रारीच्या संख्येवरुन कोणत्या विभागाचे काम सुरळीत होते, व कोणाकडे प्रकरणे प्रलंबित आहेत ते समजू शकते.

६. तरी सर्व घटकप्रमुखांनी वरीलप्रमाणे "समाधान हेल्पलाईन" हा उपक्रम त्यांच्या घटकांमध्ये सुरु करावा व त्याबाबतचा पुर्तता अहवाल / प्रगती अहवाल या कार्यालयास सादर करावा, तसेच काही सुधारणा असल्यास त्या ह्या कार्यालयास कृपया तातडीने कळवाव्यात.

( अर्चना त्यागी )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
इतर सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सहीत)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
उप संचालक, डीटीएस्. नाशिक.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई /वाहतूक मुंबई / नविअ.नागपूर.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा., मुंबई .
संचालक, म.पो.अ.नाशिक/म.गु.प्र.पुणे / मो.प.पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
वरिष्ठ उप सहायक (नि.वे.),
सर्व उप सहायक, पोमसं कार्यालय.
सर्व कार्यासन अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय.

D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

Scanned with CamScanner